मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ पिंपरी-चिंचवडमध्ये आंदोलक धडकणार तहसील कार्यालयावर!

## मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठींबा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठींबा दर्शवण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरात सकल मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने उद्या दि. २ नोव्हेंबर २०२४ रोजी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने लोकांनी सहभागी व्हावे असे, आवाहन त्यांच्या वतीने करण्यात आले आहे. गुरुवारी सकाळी ११.०० वाजता आकुर्डी येथील खंडोबा माळ येथून या मोर्चाला सुरुवात होणार आहे. शहरातील तहसील कार्यालय येथे विसर्जित करण्यात येणार आहे. दिघी येथे गुरुवार दि. २ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७.३० वाजता महादेव मंदिर, दिघी येथे दुग्ध अभिषेक करण्यात येणार आहे . त्यानंतर भव्य मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीचा ग्रामदैवत भैरवनाथ महाराज मंदिर , दिघी गावठाण येथून प्रारंभ होऊन ही रॅली मराठी शाळा – जकात नाका – विठ्ठल मंदिर – साई पार्क मार्गे धर्मवीर संभाजी महाराज चौक, दिघी येथे विसर्जित करण्यात येणार आहे. मोरवाडी ते मासुळकर कॉलनी जनजागृती रॅली मासुळकर कॉलनी येथे गुरुवार दि. २ नोव्हेंबर २०२४ रोजी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७.०० वाजता मोरवाडी गणपती मंदिर येथून या रॅलीची सुरुवात होईल. पुढे म्हाडा मार्गे मासुळकर कॉलनी येथे ही रॅली विसर्जित करण्यात येणार आहे.




### 'आमदार, खासदारांनी भूमिका स्पष्ट करावी'

» पिंपरी, ता. १ : मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाज राज्यभरात आंदोलन करीत आहे. शहरातही अनेक ठिकाणी आंदोलन करत आहे. मात्र, आरक्षणाबाबत आमदार महेश लांडगे, अण्णा बनसोडे, अश्विनी जगताप व उमा खापरे तसेच खासदार श्रीरंग बारणे यांनी भूमिका स्पष्ट केली नाही. यामुळे त्यांच्याविषयी प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात येत असून चोवीस तासांत त्यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत करण्यात आली. सतीश काळे, प्रकाश जाधव, मारुती भापकर, धनाजी येळकर पाटील, नकुल भोईर, वैभव जाधव, मीरा कदम, सुनीता शिंदे, कल्पना गिडडे, नानासाहेब वारे उपस्थित होते.

# चिखलीत पाच एकर जागेत गोशाळा

## मोकाट जनावरांचा प्रश्न सुटणार

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरात दिवसेंदिवस मोकाट जनावरांची संख्या वाढत असल्यामुळे गोशाळा असणे गरजेचे झाले आहे. शहरात ७०० मोकाट जनावरे असून यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली येथील सुमारे पाच एकर जागेत गो-संवर्धन केंद्र आणि गोशाळा सुरू करण्यात येणार आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वाढत असल्यामुळे रस्त्यावर फिरणाऱ्या गायी, बैल आदी गोवंशाची संख्या सुमारे ७०० च्या आसपास आहे. गोवंश शहरातील रस्त्यांवर पहायला मिळतात. जखमी झाल्यामुळे किंवा आजारी असल्यामुळे संबंधित



गोवंशाला उपचाराची आवश्यकता असते. अनेकदा उपचाराअभावी मृत्यूचे प्रकार घडतात. मोकाट जनावरे रस्त्याच्या मध्यभागी बसून असतात. त्यामुळे वाहतूक कोंडी आणि लहान-मोठे अपघाताच्या घटनाही वारंवार घडल्या आहेत. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडून गोशाळा सुरू करण्याबाबत गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. गोशाळा आणि गो संवर्धन व उपचार केंद्र सुरू केल्यास गोवंश वृद्धीच्या दृष्टीने हितकारक ठरणार आहे. त्यासाठी महापालिकेने सकारात्मक भूमिका घेत चिखलीत गो-शाळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. चिखली, पाटीलनगर येथील इंद्रायणी नदीच्या शेजारी महापालिकेची पाच एकर जागा आहे. या जागेकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने गो शाळेचा प्रश्न प्रलंबित आहे. जागेसाठी पशुवैद्यकीय विभागाने नगररचना विभागाला पत्र देऊन जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. आता या प्रश्नी आमदार महेश लांडगे यांनी आयुक्तांबरोबर बैठक घेतल्याने रस्त्याचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे.

# भारतीय एकात्मता हीच सरदार वल्लभभाई पटेल यांना खरी आदरांजली!

## संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष विनय पत्राळे यांचे मनोगत

**चिखली । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

अखंड भारतीय एकात्मता हीच सरदार पटेल यांना ख-या अर्थाने आदरांजली ठरली आहे, असे विचार भारत भारती या संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष विनय पत्राळे यांनी व्यक्त केले. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती उत्सव समितीच्या वतीने ग. दि. माडगूळकर सभागृह, निगडी प्राधिकरण येथे मंगळवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित राष्ट्रीय एकात्मता दिन अभिवादन सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून विनय पत्राळे बोलत होते. सरदार पटेलांच्या जीवनचरित्राचे संशोधक पंकज पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य हेमंत हरहरे, ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत चौगुले, उद्योजक डॉ. मिलिंद चौधरी, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद चौधरी, गुजर समाज अध्यक्ष अजय गुजर, बहिणाबाई मंगळागौर ग्रुप अध्यक्ष विजया जंगले, लेवा पाटीदार मित्रमंडळ अध्यक्ष भागवत झोपे, नितीन बोंडे आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.




विनय पत्राळे पुढे म्हणाले की, ज्या अभिमानाने आपण भारताचा नकाशा पाहतो, त्याचे संपूर्ण श्रेय लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे आहे. व्यक्तिगत सुख – दु:ख बाजूला ठेवून त्यांनी नेहमीच जीवनात राष्ट्र कर्तव्याला प्राधान्य दिले. काँग्रेसच्या संपूर्ण कमिटीने पटेल यांचे नाव सुचविले असताना केवळ महात्मा गांधी यांनी पंडित नेहरू यांच्या नावाची शिफारस केल्यावर त्यांच्या मताचा आदर करीत त्यांनी स्वतः माघार घेत नेहरू यांना नेतृत्वाची संधी दिली. त्यामुळे अनुशासन, शिस्त यांचे प्रतीक म्हणून त्यांची इतिहासात नोंद आहे. तरीही त्यांचा योग्य तो सन्मान करण्यात आला नाही. त्यांच्या निधनानंतर बराच काळ संसदेत त्यांचे तैलचित्र लावण्याचे सौजन्य दाखविण्यात आले नव्हते. वास्तविक सरदार पटेलांच्या राजकीय मुत्सद्दीपणामुळे जम्मू काश्मीर भारतात विलीन झाले होते; परंतु दुर्दैवाने पंडित नेहरू यांनी तो प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात उपस्थित करून खूप मोठी चूक केली. कणखर भूमिका घेणाऱ्या इंदिराजी गांधी यांचेही योगदान आपल्याला विसरता येणार नाही. कणखरपणा दाखवून लवकरच पाकव्याप्त भूभाग भारतात येईल. अनेक प्रकारची भिन्नता असूनही सर्व भारतीय एक आहोत हेच आपण सरदार पटेलांच्या जयंतीनिमित्त दाखवून दिले पाहिजे! पंकज पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून, सरदार पटेल यांनी ब्रिटिशांचे अनेक मानसन्मान नाकारले होते; परंतु समस्त जनतेने त्यांना आदराने 'सरदार' ही उपाधी बहाल केली होती. ब्रिटिशांविरुद्ध त्यांनी सर्वांना सोबत घेऊन लढा दिला. सुमारे ५६५ संस्थानांचे प्रेमाने विलिनीकरण करताना त्यांनी क्वचितच बळाचा वापर केला. त्यांच्या नेतृत्वाला संधी मिळाली असती तर वेगळा भारत घडला असता! असे मत व्यक्त केले. दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. स्मिता चौधरी यांनी स्वागतगीत तसेच देशभक्तिपर गीतांचे सादरीकरण केले. विलास भोकरे यांनी तबलासाथ केली. बहिणाबाई मंगळागौर समूहाच्या महिलांनी सामूहिक नृत्याच्या माध्यमातून गणेशवंदना सादर केली. श्रीकांत चौगुले यांनी प्रास्ताविकातून, पिंपरी – चिंचवड हे भारताचे लघुरूप आहे. या नगरीत भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून पंकज पाटील वीस वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून सरदार पटेलांच्या विचारांचा जागर करीत आहेत! असे त्यांनी सांगितले. माजी सत्तारुढ पक्षनेते नगरसेवक नामदेव ढाके युवा मंच यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. शुभम ढाके, दीपक चौधरी, कैलास रोटे, भूषण पाटील, सचिन वाणी, महेश बोरोले, महेश पाटील, मनोज पाटील, योगेश महाजन, कुणाल इंगळे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. भरत बारी यांनी सूत्रसंचालन केले. सारंग चौधरी यांनी आभार मानले.

# आरक्षणच्या पार्श्वभूमीवर गहुंजे क्रिकेट मैदानाला छावणीचे स्वरूप

## दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड हा सामना हाऊसफुल्ल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बुधवारी गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड हा सामना हाऊसफुल्ल असल्याचे सांगितले जात आहे. मराठा आरक्षण आंदोलनाला ठिकठिकाणी मिळत असलेल्या हिंसक वळणाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी या सामन्यासाठी चोख बंदोबस्त ठेवला असून, सामन्याच्या पूर्वसंध्येला परिसराला छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विश्वचषक स्पर्धेची तीव्रता आणि राज्यात मराठा आरक्षणाची तीव्रता वाढली असल्याने आंदोलक आपला मोर्चा या सामन्याकडे वळवू शकतात याची भीती लक्षात घेऊन पोलिसांनी जवळपास मैदानाच्या जवळचा सगळाच परिसर ताब्यात घेतला



आहे. सामना दुपारी दोन वाजता होणार असून, मैदानाचे दरवाजे प्रेक्षकांसाठी दुपारी १२.३० वाजता उघडले जाणार आहेत. दुपारपर्यंत या आंदोलनाची झळ ठिकठिकाणी पोचत असल्यामुळे संध्याकाळनंतर पोलिसांनी संपूर्ण मैदान ताब्यात घेतले असून, सर्व दरवाजे बंद करण्यात आले आहेत. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस परिस्थिती हाताळत असल्याचे सांगितले. वाहतुकीच्या नियोजनासाठी एक पोलीस उपायुक्त, मैदान परिसरातील सुरक्षिततेसाठी एक पोलीस उपायुक्त, तीन सहायक पोलीस आयुक्त, २५ पोलीस निरीक्षक, ७० सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, ८०० अंमलदार, एसआरपीच्या तीन टीम असणार आहेत. या पोलीस बंदोबस्तामुळे मैदानाला छावणीचे स्वरूप आले आहे. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सतर्क आहे.

# पुणे विद्यापीठात हाणामारी!

## अभाविप-एसएफआयचे कार्यकर्ते एकमेकांशी भिडले

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सदस्य नोंदणीहून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) आणि स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) या दोन विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या घटनेनंतर दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळी पोलिस दाखल झाले होते. दिल्लीतील 'जेएनयू'मध्ये विद्यार्थी संघटना एकमेकांना भिडण्याच्या घटना गेल्या काही वर्षांत घडल्या आहेत. तसाच प्रकार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घडल्याचे दिसून आले. यापूर्वी, असाच संघर्ष २०१८ मध्ये पुणे विद्यापीठात झाला होता. एसएफआयची सदस्य नोंदणी सकाळी रिफेक्टरीजवळ सुरू होती. या वेळी परिषदेचे काही कार्यकर्तेही तेथे उपस्थित होते. सदस्य नोंदणीहून दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. या वादाचे रुपांतर जोरदार मारामारीत झाले. त्यात काही विद्यार्थ्यांना दुखापत झाली. या मारामारीमुळे विद्यापीठात काही काळासाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या मारामारीबाबत विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाने पोलिसांना माहिती दिल्यानंतर, तेथे पोलिस आले. पोलिसांकडून दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांची बाजू ऐकून घेण्यात आल्याची माहिती विद्यापीठातील सुरक्षा विभागाकडून देण्यात आली.



दरम्यान, या प्रकाराची विद्यापीठाकडे कोणाही तक्रार केलेली नाही. पुणे विद्यापीठामध्ये एसएफआयची सभासद नोंदणी कार्यक्रम शांततेत सुरू असतांना अभाविपच्या कार्यकर्त्यांनी अचानक येऊन, एसएफआयच्या कार्यकर्त्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात एसएफआयचे राज्य अध्यक्ष व केंद्रीय कमिटी सदस्य सोमनाथ निर्मळ, शहर सचिव अभिषेक शिंदे, गणेश जानकर यांना मार लागला आहे. इतरही कार्यकर्त्यांना सुद्धा मुका मार लागला आहे. घोळक्याने येऊन परवानगी घेतली का? असे प्रश्न विचारुन मारहाण केली. विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाने देखील फक्त बघ्याची भूमिका घेतली व नंतर मध्यस्थी केली, अशी भूमिका एसएफआयच्या राज्य समितीने मांडली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये एसएफआय आणि इतर डाव्या विचारांच्या संघटनांची परवानगी शिवाय सदस्यता नोंदणी सुरू होती. पुणे विद्यापीठामध्ये रिफेक्टरी जवळच्या परिसरात शेकडो विद्यार्थी खिचडी खाण्यासाठी येतात. खिचडी खायला आलेल्या विद्यार्थ्यांना जबरदस्ती व दमदाटीने सदस्य करून घेण्यात येत होते. यावेळी काही विद्यार्थ्यांनी सदस्य होण्यासाठी नकार दिल्यावर, संबंधित संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सामान्य विद्यार्थ्यांना मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीमध्ये काही जखमी झाले असून, एका विद्यार्थ्याच्या कपाळावर मोठी जखम झाली आहे.

> **"अभाविपची दादागिरी व गुंडगिरी वाढली असून, आजच्या घटनेत विद्यार्थ्यांना अमानुषपणे लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली आहे. या घटनेचा आम्ही निषेध करतो. विद्यापीठातील विद्यार्थी किंवा इतर संघटनांसोबत आम्ही ताकतीने उभे आहोत, याची खात्री देतो. यापुढे अशा पद्धतीची गुंडगिरी सहन केली जाणार नाही, याचे भान अभाविपने ठेवावा.**
>
> **- अक्षय जैन, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस (मीडिया विभाग)**

# एसटीच्या निम्म्या गाड्या रद्द!

## मराठा आरक्षण आंदोलनाचा परिणाम

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून राज्यभरात जाणाऱ्या निम्म्या एसटी गाड्या बुधवारी रद्द करण्यात आल्या. पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशात जाणाऱ्या गाड्या रद्द करण्यात प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. गाड्या रद्द करण्यात आल्यामुळे एसटीला बुधवारी ३३ लाख २७ हजार रुपयांच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागले.

पुण्यातील स्वारगेट, शिवाजीनगर (वाकडेवाडी), पुणे स्टेशन आणि पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर आगारातून राज्यभरात एसटी गाड्या सोडण्यात येतात. एसटीच्या



पुणे विभागाकडून दररोज एक हजार २२९ गाड्या सोडल्या जातात. मराठा आरक्षण आंदोलन तीव्र झाल्यामुळे एसटीच्या अनेक गाड्या रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाला घ्यावा लागला. एसटीच्या बुधवारी एकूण ६१४ गाड्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे ८४ हजार ९४१ किलोमीटरच्या फेऱ्या झाल्या नाहीत. त्यातून एसटीचे ३३ लाख स्वारगेट आगारातून प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात गाड्या सोडल्या जातात. शिवाजीनगर (वाकडेवाडी) आगारातून मराठवाड्यात गाड्या सोडल्या जातात. मराठा आरक्षण आंदोलनामुळे कोल्हापूर, सांगली, सोलापूर, पंढरपूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, बीड, जालना, लातूर, नागपूर, अमरावती, अकोला आणि जळगाव यासह इतर ठिकाणी जाणाऱ्या गाड्या रद्द करण्यात आल्या. ऐन दिवाळीच्या तोंडावर एसटी गाड्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

> **"मराठा आरक्षण आंदोलन सुरू असलेल्या ठिकाणी तेथील स्थानिक पोलिसांच्या सूचनेनुसार एसटी गाड्या पाठविल्या जात नाहीत. पुणे विभागात राज्यभरात जाणाऱ्या निम्म्या गाड्या बुधवारी रद्द करण्यात आल्या.**
>
> **-कैलास पाटील, विभाग नियंत्रक**

# दहावी, बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर!

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण बोर्डाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च दरम्यान, तर दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च दरम्यान होणार आहे. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक गुरुवारपासून (२ नोव्हेंबर) उपलब्ध होणार आहे. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळाने २८ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार संभाव्य वेळापत्रकानुसार बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा एक ते २२ मार्च या कालावधीत घेण्याचे नियोजन होते. या वेळापत्रकावर हरकती सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्या विचारात घेऊन राज्य मंडळाने अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध केले. त्यामुळे संभाव्य वेळापत्रक आणि अंतिम वेळापत्रक यात थोडाफार बदल झाल्याचे दिसून येत आहे. राज्य मंडळाच्या अंतिम वेळापत्रकानुसार बारावीच्या सर्वसाधारण आणि द्विलक्ष्यी अभ्यासक्रमाची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च या कालावधीत होणार आहे. याच कालावधीत व्यवसाय अभ्यासक्रमाचीही परीक्षा होणार आहे. तर माहिती तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाइन परीक्षा २० ते २३ मार्च या दरम्यान होणार आहे.

# औषधनिर्माणशास्त्र पदवीच्या ३३ टक्के जागा रिक्त!

## गेल्या वर्षीच्या तुलनेत तिप्पट प्रमाण

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या यंदाच्या प्रवेश प्रक्रियेत ३३ टक्के जागा रिक्त राहिल्या आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत रिक्त जागांचे प्रमाण जवळपास तिपटीने वाढल्याचे चित्र आहे. तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या जागाही मोठ्या प्रमाणात रिक्त राहिल्या आहेत. औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या जागा आणि महाविद्यालयांची संख्या वाढत असल्याने या अभ्यासक्रमाची स्थिती अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाप्रमाणे होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या काही वर्षांपासून राज्यात औषध निर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढल्याचे चित्र होते. पदवी अभ्यासक्रमाच्या बहुतांश जागांवर प्रवेश होत होते. करोना काळात या अभ्यासक्रमाला जास्तच पसंती मिळत होती. राज्य समायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) दिलेल्या माहितीनुसार गेल्या वर्षी राज्यात ३९६ महाविद्यालयांमध्ये ३६ हजार ८८८ जागा प्रवेशांसाठी उपलब्ध होत्या. त्यातील ३२ हजार १३७ जागांवर प्रवेश झाले.

तर चार हजार ७५१ जागा रिक्त राहिल्या होत्या. यंदा ४५३ महाविद्यालयांमध्ये ४२ हजार ७९४ जागांवर केवळ २८ हजार ४३२ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला. त्यामुळे १४ हजार ३६२ जागा रिक्त राहिल्या आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ५६ नव्या महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रियेत भर पडली होती, तर पाच हजार ९०६ जागा वाढल्या होत्या. मात्र विविध कारणांनी यंदा या पदवी अभ्यासक्रमाच्या ३३ टक्के जागा रिक्त राहिल्याचे दिसून येत आहे. असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इन्स्टिटयूट्स इन रुरल एरिया संघटनेचे अध्यक्ष रामदास झोळ म्हणाले, की राज्य शासनाने औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी बृहद् आराखडा केला आहे का, हा प्रश्न आहे.

औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या, उदाहरणार्थ, बीएमएसएस, बीएचएमएस, नर्सिंग, फिजिओथेरपी अशा अभ्यासक्रमांबरोबर राबवणे आवश्यक आहे. या सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची अंतिम तारीख एकच असावी. औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमाची नवी महाविद्यालये मोठ्या प्रमाणात सुरू झाल्याने प्रवेशाच्या जागा वाढल्या आहेत. हे प्रमाण असेच वाढत राहिल्यास अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या जागा ज्या प्रमाणात रिक्त राहत होत्या, तीच वेळ औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमावर येऊ शकते.




> **“औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवी महाविद्यालये सुरू करण्यास यंदा सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्याने सहा वर्षांनी अनेक नवी महाविद्यालये सुरू झाली. परिणामी या अभ्यासक्रमाच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढल्या.अनेक जुन्या महाविद्यालयांनीही तुकडीवाढ केली. वाढलेल्या जागांच्या तुलनेत प्रवेश न झाल्याने जागा रिक्त राहिल्या. या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा कल अजूनही आहे. मात्र, वाढलेल्या जागांमुळे भविष्यात गुणवत्ता न राखणाऱ्या महाविद्यालयांतील जागा मोठ्या प्रमाणात रिक्त राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.**
>
> **- डॉ. नीरज व्यवहारे,**
> **प्राचार्य, डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, आकुर्डी**

# कांद्याचा तुटवडा ; दोन महिने दर तेजीत!

## सरासरी दर ४२ ते ६० रुपयांच्या दरम्यान

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कांदा निर्यातीवर ४० टक्के कर आणि किमान कांदा निर्यातमूल्य प्रति टन ८०० डॉलर केल्यानंतरही कांदा दरातील तेजी कायम आहे. दर्जेदार कांद्याला शेतकऱ्यांना ५५ ते ६० रुपये किलो दर मिळत आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबर हे दोन महिने कांद्याच्या दरातील तेजी कायम राहण्याचा अंदाज आहे. उशिराच्या खरिपात लागवड केलेल्या कांद्याची काढणी डिसेंबरअखेरपासून सुरू होईल. त्यानंतर बाजारात आवक वाढून कांद्याचे दर कमी होतील. मात्र, यंदा खरीपपूर्व, खरीप आणि उशिराच्या खरीप हंगामात कांदा लागवड कमी झाली होती. त्यात पावसाने ओढ दिल्यामुळे कांदा उत्पादन कमी झाले आहे. मागील उन्हाळी हंगामातील कांदा अवकाळी पाऊस, गारपीट आणि उन्हाच्या झळांमुळे खराब झाला होता. त्यामुळे उत्पादनात घट येण्यासह कांदा जेमतेम साडेतीन महिने टिकला, त्यामुळे बाजारात कांद्याचा तुटवडा आहे. नवीन कांदा जानेवारीत बाजारात आल्यानंतर दर आवाक्यात येतील, असा अंदाज कांदा पिकाचे अभ्यासक दीपक चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. दर्जेदार कांदा प्रति किलो शेतकऱ्यांना मिळणारा दर कोल्हापुरात ५५ रुपये, सोलापुरात ७० रुपये, अकोल्यात ६५ रुपये, धुळ्यात ५१ रुपये, लासलगावात उन्हाळी कांदा ५३ रुपये, लाल कांदा ३९ रुपये, जळगावात ३९ रुपये, पुण्यात ५४ रुपये, नागपुरात ६० रुपये, छत्रपती संभाजीनगरमध्ये ५० रुपये आणि कराडमध्ये लाल कांदा ५५ रुपये किलो दराने विकला जात होता. दर्जानुसार कांद्याला सरासरी दर ४२ ते ६० रुपयांच्या दरम्यान राहिला. बाजार समित्यांमधून शेतकऱ्यांना दर्जानुसार ३० ते ६० रुपये प्रति किलो दर मिळत आहे. हा कांदा किरकोळ बाजारात येईपर्यंत वाहतूक, अडत, बाजार समित्यांचा कर, होलसेल आणि किरकोळ व्यापाऱ्यांचा नफा गृहीत धरून प्रति किलो ५० ते ८० रुपयांवर जात आहे. जानेवारीत दरात नरमाई शक्य दर्जेदार कांद्याची आवक जेमतेम आहे. कांद्याला ५५ ते ७० रुपयांपर्यंतचा दर शेतकऱ्यांना मिळत आहे. नव्या कांद्याची जानेवारीत आवक सुरू होईल, त्यानंतर दर आवाक्यात येतील.



### पुण्यात ५४ रुपये प्रति किलो

**» दर्जेदार कांदा प्रति किलो शेतकऱ्यांना मिळणारा दर कोल्हापुरात ५५ रुपये, सोलापुरात ७० रुपये, अकोल्यात ६५ रुपये, धुळ्यात ५१ रुपये, लासलगावात उन्हाळी कांदा ५३ रुपये, लाल कांदा ३९ रुपये, जळगावात ३९ रुपये, पुण्यात ५४ रुपये, नागपुरात ६० रुपये, छत्रपती संभाजीनगरमध्ये ५० रुपये आणि कराडमध्ये लाल कांदा ५५ रुपये किलो दराने विकला जात होता. दर्जानुसार कांद्याला सरासरी दर ४२ ते ६० रुपयांच्या दरम्यान राहिला.**